Reg. No. NP CITY/236/2015-17
Published on 22nd October 2015.

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## प्राधिकृत प्रकाशन

वर्ष १, अंक ३५ ] गुरूवार ते बुधवार, ऑक्टोबर १५-२१, २०१५/आश्विन २३-२९, शके १९३७ [ पृष्ठे १४, किंमत : रुपये ११.००

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी प्रत्येक विभागाच्या पुरवणीला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग एक-अ-नागपूर विभागीय पुरवणी

(भाग चार-ब मध्ये प्रसिध्द करण्यात आलेले आहेत त्यांव्यतिरिक्त) केवळ नागपूर विभागाशी संबंधित असलेले महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या, ग्रामपंचायती, नगरपालिका बरो, जिल्हा नगरपालिका, प्राथमिक शिक्षण व स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम या अन्वये काढण्यात आलेले आदेश व अधिसूचना.

भाग १-अ (ना. वि. पु.). म. शा. रा., अ. क्र. १६१.

### नगर विकास विभाग

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक ०३ ऑक्टोबर, २०१५.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६.

क्रमांक टिपीएस-२४१४-४७७-प्र.क्र.-२४८-२०१४-नवि-९.—

ज्याअर्थी, नागपूर शहराची सुधारित विकास योजना महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७ वा.) (यापुढे "उक्त अधिनियम" असे संबोधिले आहे) चे कलम ३१ उप-कलम (१) अन्वये शासन, नगर विकास विभाग, अधिसूचना क्र. टिपीएस-२४९६-२६४३- प्र.क्र.-३००-(अ)-९७-नवि-९, दि. ०७ जानेवारी, २००० अन्वये मंजूर झाली असून ती दि. ०१ मार्च, २००० पासून अंमलात आली आहे (यापुढे "उक्त विकास योजना" असे संबोधले आहे) ;

आणि ज्याअर्थी, सूचना क्र. टिपीएस-२४१४-१४३-प्र.क्र. १८९-२०१४-नवि-९, दिनांक ०६-०९-२०१४ नुसार नागपूर मेट्रो रेल्वेचे (त्यापुढे "उक्त मेट्रो रेल" असे संबोधले आहे) मार्गीका खालीलप्रमाणे निश्चित केली आहे ;

(१) ऑटोमोटीव्ह ते मिहान,

(२) प्रजापतीनगर ते लोकमान्यनगर,

आणि ज्याअर्थी, नागपूर सुधार प्रन्यासने दिनांक ०५-०८-२०१४ चे पत्रान्वये शासनास उक्त मेट्रो रेलसह नागपूर शहराच्या विकास नियंत्रण नियमावलीमधे अनुषंगीक फेरबदल (यापुढे "उक्त फेरबदल" असे संबोधले आहे) करण्याची विनंती केली आहे.

आणि ज्याअर्थी, लोकहिताचे दृष्टीने शहराच्या अस्तित्वातील विकास नियंत्रण नियमावलीमध्ये काही परिभाषांसह नवीन तरतूद क्र. ४०, परिच्छेद "W" समाविष्ट करण्याचे आवश्यक असल्याचे शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाचे कलम ३७(१) अन्वये प्रदत्त असलेल्या अधिकारानुसार, नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, सोबतच्या अनुसूचीही उक्त फेरबदलाच्या अनुषंगाने जनतेकडून हरकती/सूचना मागविण्यासाठी प्रसिध्द करीत आहे. उक्त फेरबदलांसंबंधी काही हरकती /सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत विभागीय, सह संचालक, नगर रचना, नागपूर विभाग, जुने सचिवालय, पहिला मजला, महानगरपालिका, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४० ००१ या पत्त्यावर लेखी स्वरुपात पाठवाव्यात, प्राप्त होणा-या हरकती/सूचनांवर सुनावणी देण्यासाठी सहसंचालक, नगररचना, नागपूर विभाग, नागपूर यांना प्राधिकृत करण्यात येत असून त्यांनी त्यांचा अहवाल शासनास सादर करावा.

भाग १-अ (ना. वि. पु.), म. शा. रा., अ. क्र. १६५.

## आयुक्त, महानगरपालिका यांजकडून

**विविध उत्सवाच्या/समारंभाच्या वेळी सार्वजनिक रस्त्यांवर किंवा पादचारी मार्गावर (फुटपाथवर) उभारण्यात येणा-या तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप-मंच-स्वागतद्वार-कमानी इत्यांदींना परवानगी देण्याकरिता तयार करण्यात आलेले धोरण.**

### प्रस्तावना

नागपूर ही एक उदयोन्मुख मेट्रोसिटी आहे. नागपूरला २००४ साली भारतातील अतिशय वेगाने वाढणा-या शहरांच्या यादीमध्ये स्थान मिळालेले आहे. नागपूर ही भारतीतील महाराष्ट्र राज्याची उपराजधानी असून मुंबई व पुणे नंतर तीसरे मोठे शहर आहे. नागपूर हे भारतातील नववे सर्वात मोठे शहर असून विदर्भातील सर्वात मोठे शहर आहे. नागपूर शहराची लोकसंख्या ३० लक्षपेक्षा जास्त असून या शहरात विविध धर्माचे जसे–हिन्दु, बौद्ध, जैन, शिख, मुस्लिम इत्यादी लोक सलोख्याने राहतात. ऐतिहासकदृष्ट्या शहरात विविध उत्सव/समारंभ जसे–गणेशात्सव, नवरात्री, ईद, मोहर्रम, झुलेलाल जयंती, धम्मचक्र प्रवर्तन दिवस इत्यादी मोठ्या प्रमाणात सार्वजनिकरित्या शहरातील नागरिक/संस्था/मंडळाद्वारे साजरे केले जातात. या उत्सवांचे/समारंभाचे इतिहास लक्षात घेता हे उत्सव/समारंभ साजरे करण्याकरिता नागपूर महानगरपालिका उत्सवांच्या/समारंभाच्या वेळी रस्त्यांवर किंवा पादचारी मार्गावर (फुटपाथवर) तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप/मंच स्वागतद्वार/कमानी/कक्ष/इत्यादी उभारण्याकरीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २३४ अंतर्गत पोलिस आयुक्तांच्या सहमतीने वैधानिक परवानगी देते.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २३४ प्रमाणे, पोलीस आयुक्ताच्या किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही अधिका-याचा सहमतीने, महानगरपालिका आयुक्तास कोणत्याही रस्त्यावर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप किंवा असे कोणतेही अन्य बांधकाम तात्पूरते उभारण्यासाठी लेखी परवानगी देता येईल.

त्यानुसार, नागपूर महानगरपालिकेतील दहाही विभागीय कार्यालयातील सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी यांच्याद्वारे मागील काही वर्षापासून उत्सवांच्या/समारंभाच्या वेळी रस्त्यांवर किंवा पादचारी मार्गावर (फुटपाथवर) तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप/मंच/स्वागतद्वार/कमानी/तात्पुरते कक्ष इत्यादी उभारण्याकरीता, मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशांना अनुसरुन व वाहतुक पोलिस तसेच संबंधित पोलिस स्टेशनचे "ना हरकत प्रमाणपत्र" मिळाल्यानंतर परवानगी देण्यात येत होती. उभारण्यात येणारी तात्पुरती रचना, त्या रस्त्यावरील वाहतुकीस तसेच पदपाथावरील पादचारीस कुठल्याही परिस्थितीत अडथळा निर्माण करणार नाही, या अटीवर ही परवानगी देण्यात येत होती.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, मुंबई यांनी जनहित याचिका क्र. १७३/२०१० मध्ये उत्सव/समारंभाच्यावेळी रस्त्यांवर/पादचारी मार्गावर उभारण्यात येणा-या अस्थायी (तात्पुरत्या) रचनांमुळे सामान्य नागरीकांना होणा-या गैरसोयींची, त्रासाची दखल घेवून उक्त याचिकेतील दिवाणी अर्ज (सिव्हिल इप्लिकेशन) क्र. १२४/२०१४ व २२६/२०१३ मध्ये दिनांक १३ मार्च २०१५, २४ जून २०१५ व १७ जुलै २०१५ रोजी पारीत केलेल्या आदेशान्वये महाराष्ट्रातील सर्व महानगरपालिकांना उत्सवांच्या/समारंभाच्यावेळी रस्त्यांवर/पादचारी मार्गावर अस्थायी (तात्पुरते) रचना जसे मंडप/मंच/स्वागतद्वार/कमानी इत्यादी उभारण्याकरीता दिली जाणारी परवानगी तसेच त्याचे नियमनाकरीता धोरण तयार करण्याचे आदेशीत केलेले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी दिनांक १३-०३-२०१५ रोजी पारीत केलेल्या आदेशात सर्व महानगरपालिका आयुक्तांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २३४ अंतर्गत देण्यात येणारी परवानगी व त्याकरीता तयार करण्यात येणा-या धोरणामधे मा. उच्च न्यायालयाद्वारे उक्त आदेशातील परिच्छेद ८ मधे नमूद अवलोकन/आज्ञा/मार्गदर्शक तत्वाना विचारात घेण्यास्तव निर्देशीत केलेले आहे.

करीता, मा. उच्च न्यायालयाचे जनहित याचिका क्र. १७३/२०१० मधील दिनांक २४-०६-२०१५ व १३-३-२०१५ रोजीच्या आदेशांची अंमलबजावणी करण्याकरीता तसेच नागपूर शहरातील नागरीकांना सुरळीत वाहतुक व मुक्तपणे पादचारी मार्गावर चालण्याकरीता, २४ तास उपलब्ध असण्याचे मुलभूत हक्काचे संरक्षणाच्या उद्देशाने सदर धोरणाचे प्रारुप, "उत्सवांच्यावेळी/समारंभांच्यावेळी सार्वजनिक रस्त्यांवर किंवा पदपाथांवर (फुटपाथांवर) तात्पुरत्या स्वरुपाचे मंडप/मंच/स्वागत द्वार/कमानी/तात्पुरते कक्ष/मंच इत्यादी उभारण्याकरीता देण्यात येणारी परवानगी व त्याचे नियमन करण्याकरीता" तयार करण्यात आलेले आहे.

### धोरण

क्रमांक नामनपा-१२७७-स्थावर-२०१५.—

१. **संक्षिप्त नांव व व्याप्ति :**

(१) या धोरणाला "नागपूर शहरातील रस्त्यांवर/पादचारी मार्गांवर अस्थायी स्वरुपाचे रचना उभारण्याकरीता व त्याचे नियमनाकरीता धोरण" असे म्हणावे

(२) हे धोरण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ अंतर्गत स्थापित झालेले क्षेत्र किंवा स्थापित झाली असे मानण्यात आलेल्या नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत लागू राहणार आहे.

२. नागपूर महानगरपालिका क्षेत्रांतर्गत कोणतेही सार्वजनिक उत्सव/समारंभ साजरा करण्याकरीता सार्वजनिक रस्त्यांवर/फुटपाथांवर अस्थायी स्वरुपाचे मंडप/मंच/स्वागतद्वार/कमानी इत्यादी उभारण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २३४ अंतर्गत नागपूर महानगरपालिकेची लेखी परवानगी घेणे बंधनकारक / अनिवार्य राहणार असून जर पूर्व परवानगीशीवाय असे कोणतेही तात्पूरते रचना/बांधकाम उभारण्यात आले असेल तर

कुठल्याही पूर्वसूचनेशिवाय, प्रथमदर्शनी त्या उभारण्यासाठी जबाबदार व्यक्ती/संस्था किंवा ज्या कोणाचा नांव किंवा फोटो त्या ठिकाणी दिसून येईल, अशा व्यक्तीला जबाबदार धरुन महापालिकेद्वारे काढण्यात येईल व उक्त खर्चाची भरपाई अशा किंवा संस्थांकडून करून घेण्यात येईल.

३. **महापालिकेकडून परवानगी मिळण्यासंबंधी पध्दत.—**

(१) कोणताही सार्वजनिक उत्सव/समारंभ साजरा करण्याकरीता जी कोणतीही व्यक्ती / संस्था, रस्त्यावर/फुटपाथवर अस्थायी स्वरुपाचे मंडप/मंच/स्वागतद्वार/कमानी इत्यादी उभारण्याकरीता इच्छुक असेल त्याने " विहित नमुन्यात " उत्सवाच्या/समारंभाच्या २५ दिवस अगोदर महानगरपालिकेच्या संबंधित विभागीय कार्यालयात अर्ज सादर करावा लागेल.

(२) अर्जासोबत खालील दस्ताऐवज सादर करणे अनिवार्य आहे.

(अ) पोलिस आयुक्त, नागपूर शहर यांच्या सहमती स्वरुपात पोलिस वाहतुक विभाग व संबंधित पोलिस ठाण्याची लेखी परवानगी.

(ब) प्रस्तावित अस्थायी (तात्पुरते) बांधकामाचे/रचनेचे अचूक मोजमापासह उभारावयाच्या ठिकाणाचा स्थळदर्शक/नकाशा.

(क) अस्थायी मंचाची उंची २५ फूट पेक्षा जास्त असल्यास त्याकरिता अस्थायी बांधकाम/रचना स्थिरता प्रमाणपत्र (Structural Stability Certificate) जोडणे अनिवार्य राहील. अस्थायी रचनेची उंची कोणत्याही प्रकारे ६० फुटापेक्षा जास्त राहणार नाही.

(ड) नागपूर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागाचे तात्पुरते ना हरकत प्रमाणपत्र. (Provisional No Objection Certificate)

(इ) खालील बाबींकरीता रु. १०० च्या स्टँप पेपरवर हमीपत्र सादर करावे लागेल.

(१) कोणत्याही रस्त्यावर/फूटपाथवर अर्जदाराद्वारे किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधीद्वारे/संस्थाद्वारे खोदकाम व गड्डे केले जाणार नाहीत.

(२) महाराष्ट्र राज्यात ध्वनी प्रदुषणासंबंधी प्रचलनात असलेले नियमांचे तसेच त्यासंबंधी महाराष्ट्र प्रदुषण मंडळाचे मार्गदर्शक तत्वांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे.

(३) सार्वजनिक उत्सवाकरीता आवश्यकता असल्यास तात्पुरते विद्युत मीटर व पाणीपुरवठा मीटर घेण्याबाबत.

(ई) परवानगी मागितलेल्या ठिकाणी लावण्यात येणा-या जाहिरातीचे फलकांचे/बॅनर्सचे लावण्यात येणारे स्थान व अचूक मोजमापासहितच्या जाहिरातीस शुल्क, जाहिरात धोरण प्रमाणे घ्यावे.

(उ) अर्ज पडताळणी व साईट निरीक्षणाचे शुल्क म्हणून नागपूर महानगरपालिकेच्या नावाने रु. २०० चा डिमांड ड्राफ्ट किंवा नागपूर महानगरपालिकेच्या विभागीय कार्यालयात रोखीने रु. २०० जमा केल्याबाबतची पावती हे शुल्क कुठल्याही परिस्थितीत परत करण्यात येणार नाही.

४ संपूर्ण आवश्यक दस्ताऐवजांसह " विहित नमुन्यात " सादर केलेल्या अर्जाची चाळणी/पडताळणी संबंधित सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी किंवा इतर जबाबदार अधिका-याद्वारे, जो कमीत कमी उप अभियंता स्तराचा असायला पाहिजे, सादर केलेल्या दिनांकापासून दोन आठवड्यांमध्ये करण्यात येईल. संबंधित अधिकारी, मागणी केलेल्या जागेची प्रत्यक्ष मौकाचौकशी करुन, प्रस्तावित अस्थायी बांधकामाची तांत्रिक व्यवहार्यताबाबत संबंधित सहाय्यक आयुक्ताला/वार्ड अधिकारीला लेखी स्वरुपात आपला अहवाल स्पष्ट अभिमतासह सादर करेल. संबंधित अधिका-यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी लेखी स्वरुपात आपल्या समाधानाची नोंद करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम २३४ अंतर्गत मागितल्याप्रमाणे किंवा त्याला योग्य वाटेल त्या सुधारणासह परवानगी देईल किंवा असमाधानाची नोंद घेवून त्याचे कारणासह लेखी स्वरुपात अर्ज फेटाळल्याची सूचना अर्जदाराला प्रस्तावित उत्सवाच्या/समारंभाच्या ७ दिवस अगोदर देईल.

५. उक्त परवानगी देण्याआधी सहायक आयुक्त/वार्ड अधिकारी, अर्जदाराला रु. ५ प्रति वर्ग फूट प्रति उत्सव/समारंभ व ३ x ३ फूट पिल्लर व २० फूट रुंद लांबी पर्यंत स्वागत द्वारासाठी २५० रुपये, या पेक्षा मोठे स्वागत द्वारासाठी ५०० रुपये प्रति उत्सव/समारंभ शुल्क आकारावे, या दराने गणना केलेल्या रकमेचा परवानगी शुल्क म्हणून भरणा करायला तसेच रु. १००० चा डिमांड ड्राफ्ट "सुरक्षा ठेव" म्हणून जमा करण्याचे निर्देश लेखी स्वरुपात देईल. प्रस्तावित उत्सव/समारंभ संपल्यानंतर अर्जदाराला परवानगी दिलेल्या साईट/जागेचा ताबा स्वच्छ व कोणत्याही प्रकारच्या खड्ड्याशिवाय, महापालिकेला द्यावा लागेल. जागेचा ताबा स्वच्छ व कोणत्याही प्रकारच्या खड्ड्याशिवाय मिळाल्याबाबतचा अहवाल संबंधित उप अभियंता किंवा त्याच्याद्वारे निर्देशित अधिकारी व संबंधित झोनल अधिकारी (आरोग्य) कडून मिळाल्यानंतर सुरक्षा ठेव अर्जदाराला परस्पर ९० दिवसाचे आंत परत करण्यात येईल. जागेचा ताबा अस्वच्छ आणि खोदकाम किंवा खड्ड्यांसह दिल्यास, जमा केलेली सुरक्षा ठेव जप्त करण्यात येईल व त्यातून जागा स्वच्छ करायला किंवा केलेले खड्डे भरायला किंवा जागेची दुरुस्ती करायला महापालिकेला जितका खर्च येईल तितका खर्च जप्त केलेल्या सुरक्षा ठेवेतून करण्यात येईल व उर्वरित रक्कम अर्जदाराला परत करण्यात येईल. पण महापालिकेला जप्त केलेल्या सुरक्षा ठेवेपेक्षा जास्त खर्च त्या जागेच्या स्वच्छता व दुरुस्तीकरीता लागला असेल तर त्या रकमेची वसुली अर्जदारकडून करण्यात येईल.

६. महानगरपालिका तसेच पोलिसांनी परवानगी देतांना प्रस्तावित तात्पुरते रचना उभारल्यानंतर सुरळीत वाहतुकीकरीता व पादचारींकरीता पर्याप्त जागा उपलब्ध राहणार याबाबती दक्षता घ्यावी. जर सुरळीत वाहतुकीकरीता वपादचारींकरीता पर्याप्त जागा उपलब्ध राहत नसेल तर त्या रस्त्यावरील वाहतुक व पादचारींकरीता जवळचे पर्यायी मार्ग उपलब्ध करून द्यावे जेणेकरुन पादचारी व वाहतुकीकरीता असुविधा होणार नाही. पोलिस परवानगीमध्ये वरीलप्रमाणे प्रस्तावित पर्यायी मार्गाचा उल्लेख असावा व उभारण्यात आलेल्या तात्पुरते रचनेमध्ये पादचारी व वाहतुकीच्या दृष्टिकोणाने, त्या पर्यायी मार्गाचा दिशादर्शक नकाशा, मौक्याच्या जागेवर चिन्हांद्वारे प्रदर्शित करणे बंधनकारक राहील. याकरीता महापालिकेने सदर धोरणांतर्गत दिलेली परवानगी तीन प्रतीमध्ये काढावी व त्याची एक प्रत वाहतुक पोलीस व एक प्रत संबंधित पोलिस स्टेशनला, वाहनांच्या सुरळीत वाहतुकीकरीता व पादचारी मार्गाकरीता, सुचारु व्यवस्था करण्यास्तव माहितीकरीता देण्यात यावी.

७. रेल्वे स्टेशन, बस स्थानके, प्रमुख ऑटो रिक्शा स्टँड/टॅक्सी स्टँड, रुग्णालय व शैक्षणिक संस्थांच्या परिसरात कमीत कमी ३० मीटर परीघक्षेत्रात या धोरणांतर्गत कुठल्याही प्रकारची परवानगी देण्यात येवू नये. तसेच N.H. व S.H. रोड वरील ट्रॅफिक सिग्नल असलेल्या चौकापासून ३० मीटर अंतर ठेवणे बंधनकारक राहील.